मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर या वनवृत्तांतर्गत Providing Supply, Installation,Testing and Commissioning for Audio and Projector System at Shraddhey Shri Atal Bihari Vajpayee Boitanical Garden Visapur Tah.Ballarpur Dist.Chandrapur अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.३३/वने-९
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २२ जुलै, २०२६

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम (भाग-२), दि. २०.०९.२०१९
२. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१०/इमा-२, दि.२५.०९.२०१९
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-२४/लेखा/प्र.क्र.३०/६६९/२०२५-२६, दि. १९.०१ २०२६

प्रस्तावना:-

मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर या वनवृत्तांतर्गत Providing Supply, Installation,Testing and Commissioning for Audio and Projector System at Shraddhey Shri Atal Bihari Vajpayee Boitanical Garden Visapur Tah.Ballarpur Dist.Chandrapur या कामाच्या रु. १,३६,८१,७१६/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत वाचा येथील क्र.३ नुसार विनंती केली आहे.

२. वित्त विभागाच्या वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या वाचा येथील क्र.१ चा शासन निर्णय दिनांक २०.०९.२०१९ मधील भाग एक उपविभाग-५ परि.क्र.१३४(१), १३४(२) आणि १३४(३) नुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे वाचा क्र.२ येथील दिनांक २५.०९.२०१९ च्या परिपत्रकान्वये स्थापत्य व विद्युत कामाशी संबंधित रु.१५ कोटी किंमती पर्यंतच्या कामांना संबधित मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांनी तांत्रिक सहमती दिल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे अधिकार संबंधीत उपभोक्ता विभागास देण्यात आलेले आहेत.

३. सदर कामाचे अंदाजपत्रकास वाचा येथील क्र.२ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी तांत्रिक सहमती दिलेली आहे. त्यानुसार सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वाचा येथील क्र.३ च्या पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव व वित्त विभागाचा वाचा येथील क्र.१ चा शासन निर्णय व सार्वजनिक बांधकाम विभागाचे वाचा येथील क्र.२ चे परिपत्रक विचारात घेता, मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर या वनवृत्तांतर्गत Providing Supply, Installation,Testing and Commissioning for Audio and Projector System at Shraddhey Shri Atal Bihari Vajpayee Boitanical Garden Visapur Tah.Ballarpur Dist.Chandrapur या कामाच्या रु.१,३६,८१,७१६/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास सोबत जोडलेल्या "प्रपत्र-अ" (Recapitulation Sheet) मध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील अटीच्या अधीन राहून (वित्तीय मान्यता वगळून) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी उपरोक्त तक्त्यातील नमूद अंदाजपत्रकातील कामांना वित्त विभागाचा शासन निर्णय दिनांक २०.०९.२०१९ व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २५.०९.२०१९ मधील परिपत्रकातील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक मान्यता असल्याची खातरजमा करावी.
२. अंदाजपत्रक व नकाशे उपभोक्ता विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन घेण्यात यावे.
३. काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.
४. सदरची कामे प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या रक्कमेतच पूर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी.
५. प्रस्तुत काम पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येत असल्यास संबंधीत विभागाची तसेच महानगरपालिका व तत्सम प्राधिकरणे यांची पूर्व परवानगी घ्यावी.
६. प्रस्तावातील खरेदीशी संबंधीत बाबींकरीता ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दि.२४.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सूचना विचारात घ्याव्यात.
७. प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.
८. सदर कामाच्या बांधकामाचा खर्च योजनेंतर्गत मंजूर उपलब्ध असलेल्या नियतव्ययातून करण्यात यावा.
९. ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक दरपत्रके मंजूर करूनच काम हाती घ्यावे.
१०. सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत तरतूद तसेच प्रचलित कायदे / नियम संदर्भाधीन तरतूदींचा भंग होणार नाही. तसेच कोणतीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.
११. वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ रोजीच्या परिपत्रकातील अटी व वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२. शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

१३. कामांची अंमलबजावणी करताना कामांचे एकत्रीकरण करुन नियमानुसार ई-निविदा प्रणाली अवलंबण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम (भाग-२), दिनांक २०.०९.२०१९ अन्वये वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करण्यासंदर्भातील शासन निर्णयातील भाग एक उपविभाग-५ परि.क्र.१३४(१), १३४(२) आणि १३४(३) नुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१०/इमा-२, दिनांक २५.०९.२०१९ अन्वये स्थापत्य व विद्युत कामाशी संबंधित रु.१५ कोटी किंमती पर्यंतच्या कामांना संबधित मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांनी तांत्रीक सहमती दिल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे उपभोक्ता विभागास प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२२१६३५५२८०४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SAHEBRAO NARAYAN GHIGE

Digitally signed by SAHEBRAO NARAYAN GHIGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=50720D321EE35020D5890011DABACB4544786E9FD267F17DF767B4DAD3D079B2, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=FB0550286A6A429379E74F30B4CA229BEFB58E13393AEBF97688ECB194F0EE71, cn=SAHEBRAO NARAYAN GHIGE
Date: 2026.07.22 16:36:51 +05'30'

(साहेबराव घिगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर
५. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
७. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई.
८. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन वने-२/ब-१ , वन विभाग/ महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. कार्यासन वने-९, वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)

प्रपत्र-अ

शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.३३/वने-९, दिनांक २२ जुलै, २०२६ सोबतचे प्रपत्र-अ

Name of work:-Providing Supply, Installation, Testing and Commissioning for Audio & Projectror System at Shradheya Shri Atal Bihari Vajpayee Botanical Garden, Visapur Tah. Ballarpur Dist.- Chandrapur

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Description	Amount	
1	Audio & Projectror System	11,198,000	
	Total For Work Portion =================>>>> (A)	Rs	11198000.00
	1. Testing Charges 1% =================>>>> (B)		111980.00
	Total (Work portion + Testing Charges) C		11309980.00
	2. GST @ 18% =================>>>> D (GST on C)	Rs	2035796.40
	Total TS Amount =================>>>> E (C+D)		13345776.40
	Say Total TS Amount =================>>>>		13345776
	3. Contingency 3 % =================>>>> F (3% on A)	Rs	335940.00
	Total Estimated Amount Rs. ==============>>>> (E+F)		13681716.40
	Say Amount Rs. =================>>>>		13681716

Say Rs. 13,681,716/-

SAHEBRAO
NARAYAN GHIGE

Digitally signed by SAHEBRAO NARAYAN GHIGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=50720D321EE35020D5890011DABACB4544786E9FD267F17DF767B4DAD3D079B2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FB0550286A6A429379E74F30B4CA229BEFB58E13393AEBF97688ECB194F0EE71, cn=SAHEBRAO NARAYAN GHIGE
Date: 2026.07.22 16:37:13 +05'30'

(साहेबराव घिगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन